महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१ फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

**क्रमांक: मासं/रवका/न.क्र.९/२०८१२** **दिनांक : ३०.०६.२०१४.**

**विषय: रस्ता वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्याबाबत.**

आपल्या भोवताली रस्त्यावर वेगवेगळया कारणाने अपघात होत असतात. या अपघातात सापडलेल्यांच्या कुटुंबियांवर त्याचा दूरगामी गंभीर परिणाम होतो. आपल्या आयुष्यात असा अपघात घडू नये अशी आपली प्रत्येकाचीच इच्छा असते. अर्थात अपघात काही काळ केवळ आपल्या चुकीमुळेच घडतात असे नाही. कुणीतरी काहीतरी चुक करतो, आणि त्याचा फटका इतरांना बसतो. रस्ता वाहतुकीच्या नेहमीच्या नियमांसोबतच सुरक्षेबाबत खालीलप्रमाणे विशेष काळजी घेतल्यास अशा घटनांनपासून बचाव करता येऊ शकतो.

आपण चार चाकी वाहन चालवत असाल तर गाडी सुरु करण्या अगोदरच सुरक्षा पट्टा (सेफ्टी बेल्ट) बांधून घ्या. गाडीत बसणाऱ्या प्रत्येकालाही सुरक्षा पट्टा बांधणे बंधनकारक करा. केवळ सुरक्षा पट्टा बांधल्यामुळे मोठा अपघात होता होता वाचला. किंवा सुरक्षा पट्टा बांधलेला नसल्यामुळे जीव गमावला, अशा घटना आपल्या भोवताली घडतात. यातून धडा घेऊन सुरक्षा पट्टा बांधल्याशिवाय आपण वाहन चालवणार नाही, असा निर्धार व निश्चय करा.

आपण दुचाकी वाहन चालवित असाल तर हेल्मेटशिवाय चालवू नका. आपल्या सोबत कुणी बसणार असेल तर त्यानेही हेल्मेट घालायला हवे.

रस्ता वाहतुकीतील सुरक्षेचा भाग म्हणून काही भागात सुरक्षा पट्टा बांधणे, हेल्मेट घालणे पोलीस खात्याने बंधनकारक केलेले आहे. मुळात सुरक्षा पट्टा बांधणे किंवा हेल्मेट घालणे हे आपल्या जीवीतसाठी, आपल्या कुटुंबासाठी फायद्याचे आहे. ते वापरण्यासाठी कुणीतरी सक्ती करण्याची किंवा सल्ला देण्याची वाट कशाला पाहायला हवी. म्हणून महावितरण मधील सर्वांनी रस्ता वाहतुकीच्या सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे.

**कंपनीतील सर्व वाहन चालकांना वाहन चालवताना सुरक्षा पट्टा बांधणे बंधनकारक करण्यात येत आहे.**

सदरचे परिपत्रक हे कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(स्वाक्षरी)
**( संदेश हाके)**
**कार्यकारी संचालक (मासं)**